# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

वित्त व लेखा विभाग

**परिपत्रक**

**गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत केंद्रीय पध्दतीने हिशेब तपासणी शिबिर रद्द करणेबाबत...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमासाठी महाविद्यालय/परिसंस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने महाविद्यालयास/परिसंस्थेस चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा आयोजन तसेच उपकरणे, क्रीडा साहित्य, बांधकाम/सौर ऊर्जा उपकरणे खरेदी याकरिता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले होते. मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याच्या खर्चाचे लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले हिशेब वित्त व लेखा विभागामार्फत गुणवत्ता सुधार कार्यक्रमातंर्गत केंद्रीय पध्दतीने हिशेब स्वीकारण्यात येणार असल्याचे परिपत्रक जा.क्र. वित्त/२०१९-२०/१९३०, दि. ५ मार्च, २०२० नुसार कळविण्यात आले होते.

सध्या कोरोना विषाणूचा संसर्ग झपाट्याने होत असल्यामुळे विद्यापीठातील सर्वच घटकांनी प्रतिबंधात्मक दक्षता घेणे आवश्यक असल्याने नियोजित केलेले केंद्रिय हिशेब तपासणी शिबीर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

महाविद्यालय/परिसंस्थांनी गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत मंजूर केलेले अर्थसहाय्याचे हिशेब कशापद्धतीने सादर करावयाचे याबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

**सीए अतुल पाटणकर**
**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१९-२०/2059
दिनांक : १८ मार्च, २०२०

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. संचालक, सर्व संबंधित मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.
३. उपकुलसचिव, नियोजन व विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.